# महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे - ११.



## नियामक मंडळाची ११ वी बैठक दिनांक २९-०९-१९९७

मा. ना. एकनाथरावजी खडसे, मंत्री (पा) व अध्यक्ष यांच्या अध्यक्षतेखाली नियामक मंडळाची ११ वी बैठक दिनांक २९/०९/१९९७ रोजी मुंबई येथे संपन्न झाली. बैठकीमध्ये खालील ठराव पारित झाले.

ठराव क्र. ११/१

''ठराव करण्यात येतो की, १० व्या बैठकीमध्ये पारित झालेले ठराव वाचून कायम करण्यात येत आहेत. ''

ठराव क्र. ११/२

'' ठराव करण्यात येतो की, १९९७-९८ या आर्थिक वर्षाच्या रु. २१२४२१.८७ लक्ष (रु. २१२४.२२ कोटी) खर्चाच्या अंदाजपत्रकास नियामक मंडळ मान्यता देत आहे ''

ठराव क्र. ११/३

१. ठराव करण्यात येतो की, सन १९९७-९८ या आर्थिक वर्षात रु. १२०० कोटी टप्याटप्याने उभारण्यास व त्यापैकी प्रथम टप्यामध्ये खाजगी रोखे विक्री (मालिका-४) द्वारे रू. ४०० कोटी उभारण्यास व रोख्यांचे वितरण करण्यास नियामक मंडळ मान्यता देत आहे.

२. ठराव करण्यात येतो की, १९९७-९८ या आर्थिक वर्षात रोखे विक्री प्रक्रियेसाठी lead managers, विश्वस्त संस्था, निबंधक (Registrar to issue) रेटींग एजन्सी, कर सल्लागार, लेखा परिक्षक, बँकर्स, मुद्रक, जनसंपर्क संस्था इ. संस्थाच्या नेमणूका मा. अध्यक्षांच्या संमतीने करण्याचे अधिकार कार्यकारी संचालक व मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांना देण्यात येत आहेत.

३. ठराव करण्यात येतो की, १९९७-९८ या आर्थिक वर्षात रु. १२०० कोटी रोखे विक्री प्रक्रियेसाठी प्रमुख आयोजक/व्यवस्थापक विश्वस्त संस्था, रेटींग एजन्सी, निबंधक, फॉर्मस्, माहितीपुस्तके, जनसंपर्क मोहिमेचा खर्च, जनसंपर्क सभा/बैठका/शुभारंभ इ. वरील रु. ३६ कोटी किंवा प्रत्यक्ष संकलीत रकमेच्या ३ टक्के इतक्या मर्यादेपर्यंत खर्च करण्याचे अधिकार मा. अध्यक्षांच्या सहमतीने कार्यकारी संचालक व मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांना संयुक्तिकपणे देण्यात येत आहेत. हा खर्च ३ टक्के पेक्षा जास्त होत असल्यास मा. अध्यक्षांची पूर्व मंजूरी घेण्यात यावी.

४. ठराव करण्यात येतो की, १९९७-९८ या आर्थीक वर्षात खाजगी रोखेविक्री व सार्वजनिक रोखेविक्री संबंधातील सर्व प्रकारच्या कागदपत्रांवर, दस्तऐवजांवर महामंडळातर्फे सहया करणे, संबंधितांना सहयांचे प्राधिकार महामंडळातर्फे प्रदान करणे, जमा रकमा खाते उघडणे, रोखे विक्री चालू करणे व बंद करणे, रोखे वितरण करणे, रोखे हस्तांतरण करणे व इतर सर्व

मंत्री (पाटबंधारे) व अध्यक्ष
मकृखोविम, पुणे

कार्यकारी संचालक
मकृखोविम, पुणे

आवश्यक त्या कृती/कार्यवाही करणे हे सर्व अधिकार कार्यकारी संचालक यांना देण्यात येत आहेत ''

५. ठराव करण्यात येतो की, वरील १) मधील रोखे वितरण करण्यासाठी आवश्यक तो म.कृ.खो.वि.म. पुणे, महाराष्ट्र शासन व विश्वस्त संस्था यांच्यामधील त्रिपक्षीय करार १९९६-९७ मध्ये केलेल्या त्रिपक्षीय करारानुसारच असावा व त्यावर महामंडळातर्फे स्वाक्षरी करण्याचे प्राधिकार कार्यकारी संचालक यांना देण्यात येत आहेत. तसेच कराराच्या मसुद्यामध्ये शासन निदेश देईल त्याप्रमाणे वाढ/बदल करण्यास नियामक मंडळ मान्यता देत आहे.

ठराव क्र. ११/४

'ठराव करण्यात येतो की,

१. महामंडळाकडील जलाशयांवर मत्स्योत्पादन संदर्भात सर्व प्रकारची तांत्रिक कार्यवाही (उदा. मत्स्यबीज पुरवठा इ.) महामंडळाच्या संमतीने शासनाच्या मत्स्यविकास विभागाने करावी. महामंडळास आवश्यक तो तांत्रिक सल्ला मत्स्यविकास विभागाने द्यावा.

२. मत्स्यविकास विभागास लिलाव करण्याचे अधिकार रहाणार नाहीत. मत्स्योत्पादनाचे लिलाव महामंडळाने करावेत.

३. मत्स्योत्पादनाच्या लिलावाव्दारे मिळणाऱ्या निव्वळ उत्पादनापैकी १० टक्के रक्कम वरील १ नुसार मत्स्योत्पादनासंदर्भात केलेल्या कार्यवाहीसाठी व सल्लामसलतीसाठी मत्स्यविकास विभागास देण्यात यावी.

४. वरील १ ते ३ संदर्भात कार्यवाही करण्याची तपशीलवार कार्यपध्दती महामंडळाच्या कार्यकारी समितीने ठरवावी.

५. मत्सविकास विभागाने महामंडळाच्या कार्यकक्षेत असलेल्या तलावांच्या मत्स्योत्पादनाच्या लिलावांचा आढावा घेण्यांत यावा व १९९६ च्या अधिनियम १५- कलम १९ (ड) च्या तरतूदीशी विसंगत असलेले लिलाव रद्द करुन फेरनिविदा महामंडळामार्फत मागविण्यांत याव्यात. '

ठराव क्र. ११/५

'ठराव करण्यांत येतो की, सोबतच्या परिशिष्ट २ व ३ मधील बिगरसिंचन पाणीपुरवठा परवाना मिळण्याबाबतचे २० योजनांचे प्रस्ताव, सदर प्रस्तावांचा पाणीवापर संबंधित पाटबंधारे प्रकल्पाच्या सुधारीत जलनियोजनामध्ये समावेश केला जाईल व २ महिन्याच्या पाणीपट्टी इतकी अनामत रक्कम महामंडळाकडे पाणी वापरणारी संस्था आगाऊ भरेल व दोन महिन्याचा (१९९० च्या

मंत्री (पाटबंधारे) व अध्यक्ष
मकृखोविम, पुणे

कार्यकारी संचालक
मकृखोविम, पुणे

शासन निर्णयानुसार) साठा (Storage) स्वखर्चाने करील, या अटींवर नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे.'

ठराव क्र. ११/६

"ठराव करण्यात येतो की, पवना नदीवरील महामंडळाच्या ताब्यातील चालू नसलेल्या २१ योजना महामंडळाने, लाभधारक योजना ताब्यात घ्यावयास तयार असतील या लेखी करारावर, रू. ७.४० कोटी खर्च करुन, दुरुस्त कराव्यात व लाभधारकांच्या संस्थाना हस्तांतरीत कराव्यात. ही खर्चाची रक्कम योजनेच्या किंमतीसह लाभधारकांनी महामंडळाला, महामंडळ ठरवील इतक्या हप्त्याने परत करावी. तसेच हमीपोटी लाभधारकांच्या ७/१२ च्या उताऱ्यावर महामंडळाच्या देय रकमेचा बोजा चढवावा, यासाठी सर्व संबंधित लाभधारकांनी करार करून द्यावा. "

ठराव क्रमांक ११/७

"हा विषय पुढील बैठकीत चर्चेला आणावा असे ठरले."

ठराव क्र. ११/८

"हा विषय पुढील वैठकीत चर्चेला आणावा असे ठरले."

ठराव क्र. ११/९

"ठराव करण्यात येतो की महामंडळाचे १९९६-९७ चे रू.४४८७,५०,५२,४००/- इतक्या मत्ता/दायित्वाचे लेखे, त्यावरील अंतर्गत लेखापरिक्षकांचे अभिप्राय व त्यावरील महामंडळाचा खुलासा विचारात घेऊन व दि. ३१.३.९७ चा ताळेवंद मान्य करून स्वीकृत करण्यात येत आहे.."

मंत्री (पाटबंधारे) व अध्यक्ष
मकृखोविम, पुणे

कार्यकारी संचालक
मकृखोविम, पुणे